दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | बुधवार, दि. २५ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १७९ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

बुधवार, दि. २५ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, सप्तमी दुपारी १-५१ पर्यंत, दिवस नक्षत्र– मृग संध्याकाळी ५-३४ पर्यंत नंतर आर्द्रा, चंद्र रास- मिथुन, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### महिन्याला फक्त दोनदा गॅस बुकिंग

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील तणावाच्या पार्श्वभूमीवर एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने नवे नियम लागू केले आहेत. आता एका ग्राहकाला महिन्यात जास्तीत जास्त दोनच गॅस सिलिंडर बुक करता येणार आहेत. आर्थिक वर्षात १२ अनुदानित व ३ नॉन-सब्सिडी असे एकूण १५ सिलिंडरची मर्यादा कायम आहे. तसेच, पुढील सिलिंडर बुक करण्याचा कालावधी २१ दिवसांवरून २५ दिवस करण्यात आला आहे.

## सारांश वृत्त

### 'चिथावणीखोर' भाषण केल्याप्रकरणी गुन्हा

**मेरठ :** एमआयएमचे उत्तर प्रदेश युनिटचे प्रमुख शौकत अली यांच्याविरोधात सोशल मीडियावर प्रक्षोभक भाषण केल्याचा व्हिडिओ समोर आल्याने त्यांच्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या व्हिडिओमध्ये अली आक्षेपार्ह आणि प्रक्षोभक शेरेबाजी करताना दिसत आहे.

### एलपीजीच्या काळाबाजारासाठी शून्य सहिष्णुता

**चंदीगड :** हरियाणा सरकार स्वयंपाकाच्या गॅस सिलिंडरचा काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई करत असून आतापर्यंत आठ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत आणि ८२५ एलपीजी सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक व्यवहार राज्यमंत्री राजेश नागर यांनी मंगळवारी नागरिकांना आश्वासन दिले की, राज्यात घरगुती एलपीजी पुरवठ्याची कमतरता नाही आणि घाबरून जाण्याची गरज नाही.

### बंगाल सरकारकडे निधीची मागणी करणार

**कोलकाता :** रोख रकमेच्या संकटात सापडलेल्या जादवपूर विद्यापीठाने पश्चिम बंगाल सरकारकडून आर्थिक मदत घेण्याचा निर्णय घेतला असून त्याच्या कार्यकारी परिषदेने देखभाल, पायाभूत सुविधा आणि संशोधन गरजांसाठी अतिरिक्त निधीची मागणी करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली.

### फडणवीसांकडून उद्धव ठाकरेंची मनमोकळेपणाने स्तुती

# मतभेदांपलीकडील नातं अधोरेखित!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** राजकारणातील कट्टर मतभेद असूनही वैयक्तिक नात्यांची उब कायम ठेवणारे चित्र विधान परिषदेत पाहायला मिळाले. निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या निरोप समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मनमोकळेपणाने कौतुक करत राजकारणापलीकडील सन्मानाचे नाते अधोरेखित केले.

विधान परिषदेत नऊ सदस्यांचा कार्यकाळ संपत असून त्यामध्ये उद्धव ठाकरे यांचाही समावेश आहे. त्यांच्या निरोपाच्या भाषणावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, “उद्धवजींच्या स्वभावात राजकारण कमी आहे. ते पारंपरिक अर्थाने राजकारणी नाहीत. निर्णय घेताना ते त्याच्या राजकीय परिणामांची फारशी चिंता करत नाहीत.” त्यांच्या या स्पष्टवक्तेपणामुळे अनेकदा वेगळी परिस्थिती निर्माण झाली, असेही त्यांनी नमूद केले.

फडणवीसांनी उद्धव ठाकरे यांच्या स्वभावाची तुलना बाळासाहेब ठाकरे यांच्याशी करत ठाम निर्णय घेण्याची वृत्ती दोघांमध्ये समान असल्याचे सांगितले. “पुल देशपांडे यांच्यानंतर ‘कोट्याधीश’ म्हणावे, तर ते उद्धवजींनाच,” असे म्हणत त्यांनी हलक्याफुलक्या शैलीत त्यांची प्रशंसा केली.

राजकीय मतभेद असूनही वैयक्तिक जिव्हाळा कायम असल्याचे सांगताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, २०१० नंतर दोघांमध्ये अधिक जवळीक निर्माण झाली. “राजकारणात संघर्ष असतो, मतभेद असतात; पण त्याहीपलीकडे एक मानवी नातं असतं,” असे त्यांनी स्पष्ट केले.

उद्धव ठाकरे यांच्या कार्यशैलीचा उल्लेख करताना त्यांनी सर्वसामान्यांना राजकारणात संधी देण्याची परंपरा त्यांनी पुढे चालवली असल्याचे सांगितले. ज्यांना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नव्हती, अशा अनेकांना त्यांनी संधी दिली. हीच परंपरा बाळासाहेब ठाकरे यांनी सुरू केली होती, असेही त्यांनी नमूद केले. याच संदर्भात त्यांनी एकनाथ शिंदे यांचे उदाहरण देत अशा नेतृत्वातूनच नवे चेहरे घडतात, असे स्पष्ट केले.

उद्धव ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वातील संवेदनशील पैलू अधोरेखित करताना फडणवीसांनी त्यांच्या छायाचित्रणाच्या आवडीचा विशेष उल्लेख केला. “महाराष्ट्र देशा” आणि “माझा विठ्ठल” यांसारख्या त्यांच्या छायाचित्रांमधून त्यांचे संवेदनशील मन दिसून येते, असे ते म्हणाले. शेवटी, देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांना उत्तम आरोग्याच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. या भाषणातून राजकीय विरोधकांमधील परस्पर सन्मानाचे नाते आणि महाराष्ट्राच्या राजकारणातील सभ्य परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाल्याचे दिसून आले.

## “माझा पिंड कलाकाराचा, राजकारणाचा नाही”

### विधानपरिषदेत निरोपावेळी उद्धव ठाकरेंचे मनोगत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र विधानपरिषदेतील निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या निरोप समारंभात उद्धव ठाकरे यांनी भावनिक आणि विचारप्रवर्तक मनोगत व्यक्त करत आपल्या राजकीय प्रवासाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, “माझा पिंड हा राजकारणाचा नाही; माझा मूळ स्वभाव कलाकाराचा आहे.” विधानपरिषदेतून मे महिन्यात निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये उद्धव ठाकरे यांच्यासह नीलमताई गोऱ्हे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, रणजितसिंह मोहिते पाटील, संजय केनेकर यांचा समावेश आहे. त्यानिमित्ताने आयोजित निरोप समारंभात विविध पक्षांच्या नेत्यांनी भाषणे केली. उद्धव ठाकरे यांनी आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या कौतुकाचा उल्लेख करत हलक्या फुलक्या शैलीत प्रश्न उपस्थित केला की, “इतकं जवळून ओळखत होतात, तर मग अशी कोणती वेळ आली की हात सोडावा लागला?” मुख्यमंत्रीपदाचा अनुभव सांगताना त्यांनी म्हटले की, “मी या सभागृहात मुख्यमंत्री म्हणून आलो. अनेक गोष्टी आयुष्यात अनपेक्षित घडतात. जबाबदारी आली की ती टाळणे हे मर्दाचे लक्षण नाही. ती स्वीकारली पाहिजे.” कोविडसारख्या कठीण काळात प्रशासन, मंत्रिमंडळ आणि विविध विभागांच्या अधिकाऱ्यांच्या सहकार्यामुळे राज्य चालवणे शक्य झाले, “प्रशासनाचा गंध नसलेला माणूस मुख्यमंत्री होतो आणि राज्य चालवतो, हे सर्वांच्या सहकार्याशिवाय शक्य झाले नसते,” असे सांगत त्यांनी अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविका, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींप्रती

## खरात प्रकरणी मदत करणाऱ्यांचीही चौकशी -मुख्यमंत्री फडणवीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** नाशिकमध्ये उघडकीस आलेल्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात तपासाला वेग आला असून आरोपीला न्यायालयाने पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या पार्श्वभूमीवर विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतरिम अहवाल सादर करत तपासाची दिशा स्पष्ट केली. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, खरातविरोधात आतापर्यंत पाच महिलांनी लैंगिक अत्याचाराच्या तक्रारी दाखल केल्या आहेत. या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याने तपास अनेक अंगांनी सुरू असून संबंधित प्रत्येक बाबीची सखोल चौकशी केली जात आहे. “खरातला मदत करणाऱ्या सर्वांची चौकशी केली जाईल. ज्यांच्याविरोधात ठोस पुरावे मिळतील, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल,” असे स्पष्ट करत फडणवीस म्हणाले की, तपास यंत्रणा डिलीट केलेला डेटा पुन्हा मिळवण्याचे काम करत आहे. कोणकोणत्या व्यक्तींनी संपर्क साधला, आर्थिक व्यवहार झाले का, याचा तपशील लवकरच समोर येईल. तथापि, केवळ एखाद्यासोबत फोटो असल्याच्या आधारे कुणालाही आरोपी ठरवता येणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे सोशल मीडियावर किंवा चर्चेत असलेल्या नावांबाबत ठोस पुराव्यांनंतरच कारवाई होणार असल्याचे संकेत दिले.

### आमदार रोहित पवारांच्या पाठपुराव्याला यश

# दादांच्या विमान अपघाताचा कर्नाटकात गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** बारामतीजवळ घडलेल्या लियरजेट ४५ विमान दुर्घटनेप्रकरणी अखेर गुन्हा दाखल करण्यात आला असून राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले आहे. कर्नाटकातील बंगळुरू येथील शेशाद्रीपुरम पोलीस ठाण्यात ‘झिरो एफआयआर’ नोंदवण्यात आला असून या दुर्घटनेमागे गुन्हेगारी कट असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. २८ जानेवारी २०२६ रोजी मुंबईहून बारामतीकडे येणारे व्हीटी-एसएसके नोंदणीचे बॉम्बार्डियर लियरजेट ४५ विमान सकाळी सुमारे ८.४३ ते ८.४५ वाजण्याच्या सुमारास कोसळले होते. व्हीएसआर व्हेंचर्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून हे विमान चालवले जात होते. या भीषण दुर्घटनेत विमानातील सर्व पाच जणांचा मृत्यू झाला होता. मृतांमध्ये तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाही समावेश होता. या प्रकरणी रोहित पवार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १७३(१) अंतर्गत तक्रार दाखल केली होती. यापूर्वी त्यांनी मुंबईतील मरीन ड्राइव्ह आणि बारामती पोलीस ठाण्यांशी संपर्क साधला होता; मात्र एफआयआर नोंदवला गेला नव्हता. त्यानंतर त्यांनी विधानसभेतही हा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाच्या भूमिकेवर टीका केली होती. या तक्रारीत या दुर्घटनेला केवळ अपघात न मानता मोठ्या गुन्हेगारी कटाचा भाग असल्याचा दावा करण्यात आला आहे. विमान सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन, देखभालीतील निष्काळजीपणा, बनावट नोंदी तयार करणे आणि असुरक्षित स्थितीत विमानाचा वापर सुरू ठेवणे यांसारख्या गंभीर बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाच्या २४ फेब्रुवारी रोजीच्या सुरक्षा लेखापरीक्षण अहवालात संबंधित कंपनीच्या काही विमानांना निष्काळजीपणामुळे उड्डाणासाठी अयोग्य ठरवण्यात आल्याचे नमूद आहे. दुर्घटनाग्रस्त विमानाने सुमारे ४९१५ उड्डाण तास पूर्ण केले होते, जे ५००० तासांच्या अनिवार्य ‘टाइम बिफोर ओव्हरहॉल’ मर्यादेच्या जवळ होते. तरीही ते व्यावसायिक वापरासाठी चालू ठेवण्यात आले होते, असा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, प्रत्यक्ष उड्डाण तास अधिक असून अधिकृत नोंदींमध्ये कमी दाखवण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. काही प्राथमिक माहितीनुसार विमानाने ८००० तासांहून अधिक उड्डाण केले असण्याची शक्यता असून हे प्रमाण सुरक्षित मर्यादेपेक्षा जास्त असल्याचे म्हटले जात आहे. या पार्श्वभूमीवर केवळ तांत्रिक चौकशीपुरता तपास मर्यादित न ठेवता गुन्हेगारी तपासही स्वतंत्रपणे करण्याची मागणी करण्यात आली आहे. एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरोच्या चौकशीबरोबरच जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. या प्रकरणात आता एफआयआर नोंदवण्यात आल्याने पुढील तपासाची दिशा स्पष्ट होणार असून दुर्घटनेमागील खरे कारण समोर येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### अत्याचार, फसवणूक प्रकरणात तपासाला गती; संशयास्पद साहित्य जप्त

# अशोक खरातला २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नाशिक :** महिलांवरील अत्याचार, फसवणूक आणि संशयास्पद कृत्यांच्या आरोपांमुळे चर्चेत आलेल्या स्वयंघोषित ज्योतिषी अशोक खरात याला नाशिक सत्र न्यायालयाने २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर आज दुपारी त्याला पुन्हा न्यायालयात हजर करण्यात आले आणि पुढील तपासासाठी पोलिसांनी अतिरिक्त कोठडीची मागणी केली. सरकारी वकिलांनी न्यायालयात मांडलेल्या माहितीनुसार, आरोपीकडून मोठ्या प्रमाणावर संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले आहे. त्यात सुमारे ६ लाख ५३ हजार रुपयांची रोकड, लॅपटॉप, डीव्हीआर तसेच राजमुद्रा असलेले काळ्या रंगाचे रिव्हॉल्व्हर आणि ३१ काडतुसे आढळली आहेत. त्यापैकी पाच काडतुसे वापरण्यात आल्याचे निदर्शनास आले असून ती नेमकी कुठे वापरण्यात आली याचा तपास सुरू आहे. काही प्रकरणांत नरबळीचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे. तपासादरम्यान आरोपी स्वतःला कॉस्मोलॉजी तज्ज्ञ असल्याचे सांगत होता आणि त्याच्याकडे संबंधित काही प्रमाणपत्रेही आढळली आहेत. मात्र, त्याच्या नावाखाली महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे गंभीर आरोप आहेत. विशेषतः तरुण महिलांना लक्ष्य करून फसवणूक आणि अत्याचार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिसांनी न्यायालयात सांगितले की, आरोपीकडून दिले जाणारे पेढे किंवा पाणी घेतल्यानंतर पीडितांना मळमळ होत असे. त्यामुळे त्यामध्ये कोणते द्रव्य मिसळले जात होते, याचा शोध घेणे आवश्यक आहे. तसेच, आरोपीकडून दाखवण्यात येणारे साप, वाघ यांसारखे प्राणी खरे होते की बनावट, याचाही तपास सुरू आहे. वन्यजीव संबंधित कायद्यांतर्गत गुन्ह्यांची शक्यता देखील तपासली जात आहे. दरम्यान, आरोपीच्या वकिलांनी पोलिसांची मागणी फेटाळत सांगितले की, सात दिवसांपासून तपास सुरू असून आवश्यक पुरावे आधीच जप्त करण्यात आले आहेत. त्यामुळे पुढील पोलीस कोठडीची गरज नसल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. मात्र, न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेत आरोपीला पाच दिवसांची म्हणजेच २९ मार्चपर्यंत पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणाची पार्श्वभूमी पाहता, नाशिकमधील सरकारवाडा पोलीस ठाण्यात एका ३५ वर्षीय महिलेवर गुंगीचे औषध देऊन बलात्कार केल्याचा गुन्हा दाखल आहे.

### आसिया अंद्राबीला जन्मठेपेची शिक्षा

**नवी दिल्ली :** काश्मिरी फुटीरतावादी आणि दुख्तरान-ए-मिल्लतच्या प्रमुख आसिया अंद्राबी यांना दिल्ली न्यायालयाने मंगळवारी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश चंदरजीत सिंग यांनी अंद्राबीचे दोन सहकारी सोफी फहमीदा आणि नाहिदा नसरीन यांनाही या प्रकरणात ३० वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली. न्यायालयाने अंद्राबीला कठोर बेकायदेशीर कृत्ये (प्रतिबंध) कायदा (यूएपीए) च्या कलम १८ (कट रचण्यासाठी शिक्षा), आणि पूर्वीच्या आयपीसीच्या कलम १२० बी (गुन्हेगारी कट रचणे) आणि १२१ ए अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

## महाराष्ट्र-गोवा बार कौन्सिल निवडणूक पुण्यातून ७३८६ मतदारांनी बजावला हक्क

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मंगळवारी (ता. २४) मतदान होत असून जिल्ह्यातील ११ ठिकाणी मतदानाची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकीत जिल्ह्यातील सहा उमेदवार रिंगणात असून सुमारे साडेपाच हजार वकील मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीत पुणे जिल्हा सत्र न्यायालयाच्या एकूण १९९२३ मतदारांपैकी ७३८६ मतदारांनी आपला हक्क बजावला. कसबा बावडा येथील जिल्हा न्यायालयात कोल्हापूर शहर, करवीर तसेच बेळगाव, चिक्कोडी, खानापूर, अथणी आणि हुक्केरी येथील मतदारांसाठी मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे. याशिवाय आजरा, चंदगड, गडहिंग्लज, गारगोटी, इचलकरंजी, कागल, पन्हाळा, राधानगरी, कुरुंदवाड आणि जयसिंगपूर येथेही स्वतंत्र मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. या निवडणुकीत बार कौन्सिलचे माजी अध्यक्ष विवेक घाटगे, जिल्हा बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. अजित मोहिते, ॲड. रणजित गावडे, ॲड. सर्जेराव खोत यांच्यासह महिला गटातून ॲड. शैलजा चव्हाण आणि ॲड. धनश्री चव्हाण हे उमेदवार रिंगणात आहेत. संपूर्ण महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांत मिळून सुमारे १.८० लाख वकील मतदार असून १५० हून अधिक उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आहेत. सहा जिल्ह्यांतील सुमारे १८ हजारांहून अधिक मतदार या निवडणुकीत सहभागी होत आहेत.

### महिलांसाठी ३३% आरक्षणाला गती; परिसीमनाच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचाली वेगात

# लोकसभा विस्ताराचा मोठा प्रस्ताव; ५४३ वरून ८१६ जागा वाढीची चर्चा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** देशातील संसदीय राजकारणात मोठे बदल घडवू शकणारा लोकसभा विस्ताराचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन असल्याची माहिती समोर आली आहे. सध्याच्या ५४३ जागांवरून लोकसभेची एकूण संख्या थेट ८१६ पर्यंत वाढवण्याचा विचार सुरू असून, त्यासोबत महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी गतीने करण्याची तयारीही सुरू असल्याचे संकेत मिळत आहेत.

या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एनडीए आणि काही विरोधी पक्षांच्या नेत्यांसोबत महत्त्वपूर्ण चर्चा केल्याचे समजते. या बैठकीत बीजेडी, वायएसआरसीपी, राष्ट्रवादी काँग्रेस (एसपी), शिवसेना (उद्धव गट) आणि एआयएमआयएम यांसारख्या पक्षांचा सहभाग असल्याची माहिती आहे. या चर्चांमुळे आगामी काळात संसदेत मोठ्या घडामोडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रस्तावित विस्तारामुळे लोकसभेच्या एकूण जागांमध्ये सुमारे ५० टक्क्यांची वाढ होईल. महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू झाल्यास महिला खासदारांची संख्या सध्याच्या सुमारे ८० वरून थेट २७० पेक्षा अधिक होऊ शकते. त्यामुळे संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व ऐतिहासिक पातळीवर वाढण्याची शक्यता आहे.


महाराष्ट्राच्या दृष्टीनेही हा प्रस्ताव महत्त्वाचा ठरू शकतो. सध्याच्या ४८ जागा वाढून सुमारे ७२ पर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. म्हणजेच राज्याला जवळपास २४ नव्या जागांची भर पडू शकते. यामुळे लोकसंख्येच्या प्रमाणात अधिक समतोल प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता आहे. तसेच महिलांसाठी आरक्षण लागू झाल्यास या वाढीव जागांपैकी सुमारे २४ जागा महिलांसाठी राखीव होऊ शकतात. मात्र, अंतिम आकडे परिसीमन प्रक्रिया आणि २०११ च्या जनगणनेच्या आधारे निश्चित होणार आहेत.

महिला आरक्षणाची अंमलबजावणी जलद करण्यासाठी २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्याचा पर्याय सरकार विचारात घेत आहे. २०२१ ची जनगणना अद्याप पूर्ण न झाल्यामुळे परिसीमन प्रक्रियेला विलंब होऊ नये, यासाठी हा मार्ग स्वीकारला जाऊ शकतो. दरम्यान, महिलांसाठी आरक्षित जागा निश्चित करण्यासाठी ‘लॉटरी पद्धती’चा वापर करण्याचाही प्रस्ताव आहे. यानुसार दर तिसरी जागा महिलांसाठी राखीव ठेवली जाऊ शकते.

दक्षिण भारतीय राज्यांनी व्यक्त केलेल्या चिंतेलाही या प्रस्तावातून उत्तर देण्याचा प्रयत्न दिसतो. लोकसंख्या नियंत्रणात आघाडीवर असलेल्या राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होऊ नये, यासाठी एकूण जागा वाढवून उत्तर-दक्षिण संतुलन राखण्याचा विचार करण्यात येत आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व अधिक संतुलित होण्याची शक्यता आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर संसदेत ‘नारी शक्ती वंदन’ संदर्भातील सुधारित विधेयक लवकरच मांडले जाऊ शकते. आवश्यक असल्यास विशेष अधिवेशन बोलावण्याची किंवा चालू अधिवेशनाची मुदत वाढवण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, या प्रस्तावामुळे विरोधकही सतर्क झाले असून काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी ‘इंडिया’ आघाडीची बैठक बोलावली आहे. एकूणच, लोकसभा विस्तार आणि महिला आरक्षण या दुहेरी निर्णयामुळे देशाच्या राजकीय समीकरणात मोठा बदल घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## निवडणूक आयोगाच्या पत्रावर भाजपचा शिक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**कोच्ची :** पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा वाद उफाळून आला आहे. आयोगाकडून राजकीय पक्षांना पाठवण्यात आलेल्या एका अधिकृत पत्रावर भाजपच्या केरळ युनिटचा शिक्का आढळल्याने राजकीय वातावरण तापले आहे. या घटनेवरून काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि डाव्या पक्षांनी तीव्र प्रतिक्रिया देत आयोगाला लक्ष्य केले असून, आयोग भाजपच्या प्रभावाखाली काम करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या पत्रात १९ मार्च २०१९ च्या आदेशाशी संबंधित प्रतिज्ञापत्रावर निवडणूक आयोगाच्या शिक्क्याऐवजी “भारतीय जनता पार्टी, केरळ” असा शिक्का दिसत होता. केरळमध्ये ९ एप्रिलला मतदान होणार असताना हा प्रकार समोर आल्याने विरोधकांनी यावरून निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित केले. डाव्या पक्षांनी “भाजप आणि निवडणूक आयोग एकाच टेबलावरून काम करत आहेत का?” असा सवाल केला, तर काँग्रेसने “आयोग भाजपच्या कार्यालयातून चालतोय का?” अशी टीका केली.

## संपादकीय

# व्यक्ती नव्हे, व्यवस्थाच बदलण्याची गरज



**महाराष्ट्रातील अलीकडील घडामोडींनी पुन्हा एकदा समाज, सत्ता आणि अंधश्रद्धा यांच्यातील गुंतागुंतीचे नाते उघड केले आहे. रुपाली चाकणकर यांचा राजीनामा आणि अशोक खरात प्रकरणामुळे निर्माण झालेली खळबळ ही केवळ एका घटनेपुरती मर्यादित नाही; ती संपूर्ण व्यवस्थेतील त्रुटींवर बोट ठेवणारी आहे.**


चाकणकर यांना पदावरून दूर करण्याचा निर्णय हा नक्कीच आवश्यक होता. सार्वजनिक पदावर असलेल्या व्यक्तीवर संशयाची छाया पडली, तर त्याचा परिणाम संस्थेच्या विश्वासार्हतेवर होतो. त्यामुळे त्यांना बाजूला करणे ही "साफसफाई" मानली जाऊ शकते. मात्र, हा निर्णय म्हणजे केवळ पहिल्या चुकीची दुरुस्ती आहे, ही बाब अधिक महत्त्वाची ठरते. ज्या व्यक्तीला नंतर अपात्र मानले जाते, तिलाच सुरुवातीला त्या पदावर का नेमले गेले? ही चूक कोणाची? या निर्णयामागील निकष काय होते? हे प्रश्न अनुत्तरितच राहतात. यातूनच शासनाच्या निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेचा अभाव अधोरेखित होतो. नियुक्त्या करताना गुणवत्ता, अनुभव आणि सार्वजनिक प्रतिमा यांचा विचार होतो का, की राजकीय सोय आणि समीकरणे यांनाच प्राधान्य दिले जाते? हा प्रश्न केवळ एका घटनेपुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण यंत्रणेला लागू होतो. या प्रकरणाचा सर्वात चिंताजनक पैलू म्हणजे समाजात भोंदूबाबा आणि अंधश्रद्धेला मिळणारे राजकीय पाठबळ. अशोक खरात यांच्यासारख्या व्यक्तींना समाजात उंच स्थान मिळणे हे केवळ लोकांच्या अज्ञानामुळे होत नाही. त्यामागे अनेकदा सत्ताधाऱ्यांचा थेट किंवा अप्रत्यक्ष आश्रय असतो. जेव्हा राजकीय नेते अशा व्यक्तींच्या आश्रमांना भेट देतात, त्यांच्यासोबत सार्वजनिकरीत्या दिसतात, तेव्हा समाजात त्यांना वैधता मिळते. यातून एक मूलभूत प्रश्न उभा राहतो — अंधश्रद्धा टिकते ती लोकांच्या अज्ञानामुळे, की सत्ताधाऱ्यांच्या समर्थनामुळे? जर सत्ताधारीच अशा प्रवृत्तींच्या जवळ जात असतील, तर समाजाला योग्य दिशा कोण देणार? शासनाचे काम केवळ कायदे करणे नाही, तर समाजाला विवेकाची दिशा देणेही आहे. मात्र, जेव्हा सत्तेच्या स्तरावरच विवेकाचा अभाव दिसतो, तेव्हा अंधश्रद्धेला खतपाणी मिळते.

महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदे अस्तित्वात आहेत. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन कायदा हा देशातील एक महत्त्वाचा आणि प्रगत कायदा मानला जातो. तरीसुद्धा, अशा घटना वारंवार घडतात, याचा अर्थ कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होत नाही. कायदे कागदावर असणे आणि ते प्रत्यक्षात राबवणे यात मोठा फरक आहे. अंमलबजावणी यंत्रणा निष्क्रिय असेल, तर कोणताही कायदा निष्प्रभ ठरतो. अशा प्रकरणांमध्ये पोलिस, प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी तत्परतेने आणि निर्भयपणे कारवाई करणे अपेक्षित असते. मात्र, अनेकदा राजकीय दबाव, स्थानिक प्रभाव किंवा भीती यामुळे कारवाई उशिरा होते किंवा अपुरी ठरते. या सर्व घटनांमधून एक गोष्ट स्पष्ट होते — व्यक्ती बदलून प्रश्न सुटत नाहीत. एखाद्या अधिकाऱ्याला किंवा पदाधिकाऱ्याला हटवणे हा तात्पुरता उपाय असू शकतो; पण तो दीर्घकालीन तोडगा नाही. जर व्यवस्थेतील दोष तसेच राहिले, तर अशा घटना पुन्हा पुन्हा घडत राहतील. म्हणूनच, आज गरज आहे ती व्यवस्थात्मक बदलांची. नियुक्ती प्रक्रियेत पारदर्शकता, जबाबदारी आणि गुणवत्ता यांना प्राधान्य दिले पाहिजे. अंधश्रद्धेविरोधातील कायद्यांची कठोर अंमलबजावणी झाली पाहिजे. समाजात जागृती निर्माण करण्यासाठी शिक्षण, जनजागृती आणि माध्यमांची भूमिका अधिक प्रभावी झाली पाहिजे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे सत्ताधाऱ्यांनी स्वतः आदर्श घालून दिला पाहिजे. त्यांनी कोणत्या व्यक्तींशी संबंध ठेवायचे, कोणत्या कार्यक्रमांना उपस्थित राहायचे, याबाबत संवेदनशीलता दाखवली पाहिजे. कारण त्यांच्या प्रत्येक कृतीचा समाजावर परिणाम होत असतो. आजचा समाज माहितीच्या युगात जगत असला, तरी अंधश्रद्धेच्या विळख्यातून पूर्णपणे मुक्त झालेला नाही. यामागे केवळ अज्ञान नाही, तर व्यवस्थेतील कमकुवतपणा आणि सत्तेचे मौनही कारणीभूत आहे. या पार्श्वभूमीवर हा प्रश्न अधिक तीव्रतेने समोर येतो — आपण खरोखरच बदल घडवू इच्छितो का, की केवळ वरवरची साफसफाई करून समाधान मानतो? "बाईबळीवर बोळवण" करण्याची परंपरा थांबवायची असेल, तर मूळ घाण काढण्याचे धैर्य दाखवावे लागेल. अखेर, कोणत्याही समाजाची प्रगती ही केवळ आर्थिक विकासावर मोजली जात नाही; ती त्याच्या विचारसरणीवर, विवेकावर आणि न्यायव्यवस्थेवरही अवलंबून असते. अंधश्रद्धा, राजकारण आणि सत्तेच्या संगनमताला आळा घालण्यासाठी केवळ कारवाई नव्हे, तर ठोस धोरण, कडक अंमलबजावणी आणि व्यापक समाजजागृती आवश्यक आहे. अन्यथा, घटना बदलतील, चेहरे बदलतील; पण वास्तव मात्र तसेच राहील.

# 'विकसित भारत' आणि दडपशाहीचे सावट

भारत २०४७ पर्यंत 'विकसित राष्ट्र' होण्याचे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, या विकासाचा पाया नेमका कोणत्या मूल्यांवर उभा आहे, हा प्रश्न अधिक तीव्रतेने समोर येत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उज्जल भुईयां यांनी व्यक्त केलेल्या भूमिकेमुळे हा मुद्दा केवळ आर्थिक प्रगतीपुरता मर्यादित न राहता लोकशाही, स्वातंत्र्य आणि न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांशी निगडित ठरतो. 'विकसित भारत' घडवताना दडपशाहीचा मार्ग स्वीकारला, तर त्या विकासाची दिशा आणि टिकाऊपणा दोन्ही धोक्यात येऊ शकतात, असा स्पष्ट इशारा त्यांच्या विधानातून समोर येतो. न्यायमूर्ती भुईयां यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'विकसित भारत' ही संकल्पना दडपशाहीच्या आधारे उभी राहू शकत नाही. विशेषतः बेकायदेशीर क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा (UAPA) सारख्या कठोर कायद्यांचा अतिरेक किंवा गैरवापर हा विकासाचा मार्ग ठरू शकत नाही. हा इशारा केवळ कायद्याच्या वापरापुरता मर्यादित नाही, तर तो शासनपद्धतीच्या मूलभूत तत्त्वांवरच प्रश्नचिन्ह उपस्थित करतो.

आजच्या काळात सर्वात गंभीर चिंता म्हणजे मतभिन्नतेचे गुन्हेगारीकरण. लोकशाही व्यवस्थेत मतभिन्नता ही केवळ स्वाभाविक नसून आवश्यक असते. समाजात विविध विचार, मते आणि दृष्टिकोन असतील, तरच प्रगतीचा मार्ग सुकर होतो. मात्र, आंदोलन, सोशल मीडियावरील पोस्ट किंवा शासनावरील टीका यांसाठी गुन्हे दाखल होण्याची प्रवृत्ती वाढत असल्याचे चित्र दिसते. यामुळे लोकशाहीचा आत्माच धोक्यात येतो. याच संदर्भात UAPA अंतर्गत होणाऱ्या अटक आणि दोषसिद्धीच्या प्रमाणातील तफावतही चिंताजनक आहे. मोठ्या प्रमाणावर अटक होते, पण दोषसिद्धीचे प्रमाण अत्यल्प राहते. याचा अर्थ अनेक व्यक्तींना दीर्घकाळ तुरुंगात ठेवले जाते, परंतु शेवटी आरोप सिद्ध होत नाहीत. "बेल हा नियम, जेल हा अपवाद" ही न्यायव्यवस्थेची मूलभूत संकल्पना अशा प्रकरणांत उलटी होत असल्याचे दिसते. ही स्थिती न्याय आणि मानवाधिकारांच्या तत्त्वांनाच आव्हान देणारी आहे. या पार्श्वभूमीवर न्यायव्यवस्थेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. न्यायालये ही केवळ कायद्याची अंमलबजावणी करणारी संस्था नसून, ती नागरिकांच्या मूलभूत हक्कांची अंतिम संरक्षक असतात. कार्यकारी यंत्रणा अतिरेक करत असल्यास न्यायालयांनी हस्तक्षेप करून संतुलन राखणे गरजेचे असते. न्यायमूर्ती भुईयां यांचे वक्तव्य हे न्यायालयीन मर्यादेपलीकडे जाऊन सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणारे आहे. मात्र, हा प्रश्न केवळ कायदा आणि न्यायालयापुरता मर्यादित नाही. न्यायमूर्ती भुईयां यांनी "deep social fault lines" म्हणजेच समाजातील खोलवर रुजलेल्या विषमता — विशेषतः जातीय भेदभाव — यांचाही उल्लेख केला. यावरून एक महत्त्वाचा मुद्दा स्पष्ट होतो की, विकास केवळ आर्थिक वाढीवर अवलंबून नसतो; तो सामाजिक न्यायावरही आधारित असतो. जर समाजातील मोठा घटक अजूनही अन्याय, भेदभाव आणि संधीअभावी झुंजत असेल, तर त्या देशाला 'विकसित' म्हणणे अपूर्ण ठरेल. इतिहासाकडे पाहिले, तर दडपशाहीच्या आधारे उभे राहिलेले विकास मॉडेल दीर्घकाळ टिकलेले नाहीत. अल्पकालीन स्थैर्यासाठी स्वातंत्र्यावर निर्बंध घालणे सोपे असते; पण त्याचे परिणाम दीर्घकालीन अस्थैर्याच्या रूपाने समोर येतात. त्यामुळेच विकास आणि स्वातंत्र्य यामध्ये समतोल साधणे अत्यावश्यक ठरते.




**» भारत २०४७ पर्यंत 'विकसित राष्ट्र' बनण्याचे स्वप्न पाहत आहे. पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जागतिक प्रभाव या सर्व क्षेत्रांत झपाट्याने प्रगती करण्याचा देशाचा निर्धार आहे. मात्र, या विकासाच्या प्रवासात लोकशाही मूल्ये, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि न्यायव्यवस्थेची भूमिका किती सशक्त राहते, हा अधिक महत्त्वाचा प्रश्न ठरतो.**

शासनासाठी हे मोठे आव्हान आहे. देशाच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे आवश्यक असतात, याबाबत वाद नाही. मात्र, त्या कायद्यांचा वापर करताना पारदर्शकता, जबाबदारी आणि मानवी हक्कांचे भान राखणे तेवढेच गरजेचे आहे. एज व्हेरिफिकेशन, न्याय्य चौकशी प्रक्रिया, वेळेत सुनावणी आणि जामीनाबाबत स्पष्ट धोरण या गोष्टींची अंमलबजावणी काटेकोरपणे झाली पाहिजे. तसेच, न्यायव्यवस्थेनेही अधिक सक्रिय आणि संवेदनशील भूमिका घेण्याची गरज आहे. अटक, चौकशी आणि जामीन या प्रक्रियांमध्ये नागरिकांचे मूलभूत हक्क अबाधित राहतील, याची खात्री करणे ही न्यायालयांची जबाबदारी आहे. अन्यथा, कायद्याचा वापर हा न्यायासाठी नव्हे, तर अन्यायासाठी होण्याचा धोका निर्माण होतो.

अखेर, 'विकसित भारत' ही केवळ आर्थिक संकल्पना नाही; ती एक मूल्यव्यवस्था आहे. जिथे नागरिकांना मुक्तपणे विचार मांडण्याचे स्वातंत्र्य आहे, जिथे कायदे न्यायासाठी वापरले जातात आणि जिथे प्रत्येकाला समान संधी मिळते — तोच खरा विकसित भारत ठरतो.

जर या मूल्यांकडे दुर्लक्ष झाले, तर विकासाचे स्वप्न केवळ आकड्यांपुरते मर्यादित राहील. न्यायमूर्ती उज्जल भुईयां यांचा इशारा स्पष्ट आहे — दडपशाहीवर विकास उभा राहत नाही; तो उभा राहतो स्वातंत्र्य, न्याय आणि समानतेच्या भक्कम पायावर.

# देहूरोड–सुतारवाडी 'एलिव्हेटेड कॉरिडॉर'ला विधानसभेत हिरवा कंदील

## पिंपरी-चिंचवड, हिंजवडीसह पश्चिम पुण्याची वाहतूक कोंडी सुटणार; 15.87 किमी प्रकल्पामुळे कनेक्टिव्हिटीला चालना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातून जाणाऱ्या मुंबई–बंगळूर महामार्गावरील वाढत्या वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाय म्हणून देहूरोड ते सुतारवाडी या दरम्यान 15.87 किलोमीटर लांबीचा सहा पदरी एलिव्हेटेड कॉरिडॉर उभारण्यास विधानसभेत शिक्कामोर्तब झाले आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे पिंपरी-चिंचवड, हिंजवडी आयटी पार्क आणि पश्चिम पुण्यातील उपनगरांना मोठा दिलासा मिळणार असल्याची माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.



राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान नवले उड्डाणपुलाच्या वाहतूक समस्येबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्री योगेश कदम यांनी देहूरोड ते सुतारवाडी या एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या प्रस्तावाची सविस्तर माहिती दिली. नवले पुलाला जोडणारा हा प्रकल्प भविष्यातील वाहतूक नियोजनासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून (NHAI) पुणे व पिंपरी-चिंचवड शहरांची कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात येत आहेत. यामध्ये भूसंपादन, सेवा रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण यांसारख्या कामांना प्राधान्य दिले जाणार आहे.

नाशिक फाटा ते खेड या आठ पदरी एलिव्हेटेड मार्गाच्या धर्तीवर हा प्रकल्प उभारला जाणार असून, शहरातील वाढत्या वाहनसंख्येला सक्षम प्रतिसाद देणारी पायाभूत सुविधा निर्माण होणार आहे.

**हिंजवडी आयटी हबसाठी मोठे वरदान**

हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक कोंडी दिवसेंदिवस गंभीर होत आहे. प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉरमुळे वाकड, ताथवडे, पुनावळे, रावेत तसेच बालेवाडी, बाणेर, सुस आणि बावधन या भागांतील प्रवास अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे. याशिवाय माण, मारुंजी, नेरे, जांबे, कासारसाई आणि किवळे या परिसरांनाही मोठा फायदा होणार आहे.

**प्रतिक्रिया : आमदार शंकर जगताप**

"पिंपरी-चिंचवड आणि हिंजवडी परिसरातील वाहतूक कोंडी हा दिवसेंदिवस वाढणारा गंभीर प्रश्न आहे. देहूरोड ते सुतारवाडी एलिव्हेटेड कॉरिडॉर हा यावर प्रभावी उपाय ठरेल. या प्रकल्पामुळे प्रवासाचा वेग वाढेल, वेळेची बचत होईल आणि शहराच्या कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळेल. शासनाने भूसंपादन व सेवा रस्त्यांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," असे आमदार जगताप यांनी स्पष्ट केले.

एकूणच, हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पश्चिम पुण्यातील वाहतूक व्यवस्थेला मोठा दिलासा मिळणार असून, भविष्यातील शहरी विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# आरटीई विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारण्यास मनाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क किंवा साहित्याच्या नावाखाली पैसे घेण्यास शाळांना परवानगी नसल्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विधानसभेत स्पष्ट केले.

विधानसभेत सदस्य Yogesh Sagar यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर उत्तर देताना मंत्री भुसे म्हणाले की, राज्यातील खासगी शाळांमध्ये आरटीई अंतर्गत २५ टक्के जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक असून त्यांच्या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून केली जाते.

सध्या राज्यात सुमारे २९०० कोटी रुपयांची प्रतिपूर्ती प्रलंबित आहे. मात्र, याचा आधार घेऊन शाळांना पालकांकडून शुल्क वसूल करण्याचा अधिकार नाही. १ जुलै २०१५ पासूनच शासनाने याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत.

जर कोणत्याही शाळेने नियमांचे उल्लंघन करून शुल्क आकारले असेल, तर संबंधित रक्कम परत करण्याचे आदेश देण्यात येतील. तसेच संबंधित शाळांवर नोटीस देऊन आवश्यक ती कारवाई केली जाईल, असेही मंत्री भुसे यांनी सांगितले.

दरम्यान, शाळा बंद करण्याचा कोणताही विचार नसून निधी उपलब्ध होताच प्रलंबित शुल्काची प्रतिपूर्ती टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचे राज्यभर ऑडिट

## शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकतेला चालनाच भिवंडीतील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील शिक्षण व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेत, सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच अनुदानित शाळांचे राज्यव्यापी ऑडिट करण्यात येणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विधानसभेत केली. भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या शाळांची दुरवस्था लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असून, शिक्षणासाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विधानसभेत सदस्य रईस शेख यांनी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेच्या शाळांच्या स्थितीबाबत लक्षवेधी सूचना मांडत गंभीर प्रश्न उपस्थित केला होता.



त्यावर उत्तर देताना मंत्री भुसे यांनी सांगितले की, शाळांमधील पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता आणि विद्यार्थ्यांच्या सोयीसुविधांचा सखोल आढावा घेण्यासाठी हे ऑडिट महत्त्वाचे ठरणार आहे.

भुसे पुढे म्हणाले की, शाळांमधील ड्रॉपआऊटचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष उपाययोजना राबवण्यात येतील. स्थानिक स्वराज्य संस्थांनी मागणी केल्यास नववी-दहावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास तसेच आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करण्यास शासन परवानगी देणार आहे. शिक्षण क्षेत्रात अधिक गुंतवणूक होणे अत्यावश्यक असून, यासाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांशी चर्चा करून अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेतील शाळांची सद्यस्थिती स्पष्ट केली. त्यांच्या माहितीनुसार, महानगरपालिकेमार्फत ८६ प्राथमिक आणि ११ माध्यमिक अशा एकूण ९७ शाळा चालवल्या जातात. यापैकी काही इमारती धोकादायक घोषित झाल्याने सध्या ४६ शाळा दोन सत्रांमध्ये सुरू आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायक इमारतींमधील शाळांचे ऑडिट करून विद्यार्थ्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. तसेच, विविध शाळांच्या दुरुस्ती आणि नूतनीकरणासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून काही कामे प्रगतीपथावर असल्याचेही त्यांनी नमूद केले. महानगरपालिकांनी शिक्षणासाठी स्वतंत्र निधी राखून ठेवण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.या निर्णयामुळे राज्यातील शाळांच्या दर्जात सुधारणा होण्यास मदत होईल, तसेच विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्रवाशांसाठी अत्याधुनिक प्रवासाची नवी दिशा; मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुभारंभ

# एसटीच्या 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचे लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात अत्याधुनिक सुविधांनी सज्ज 'राजमाता जिजाऊ' बस सेवेचा भव्य लोकार्पण सोहळा पार पडला. मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्या हस्ते या नव्या बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक परिवहन अधिक सक्षम आणि प्रवासी-केंद्रित होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे.




विधानभवन प्रांगणात झालेल्या या सोहळ्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधींनीही उपस्थिती दर्शवली.

'राजमाता जिजाऊ' या नावाने सुरू करण्यात आलेली ही बस सेवा महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाला अभिवादन करणारी ठरली आहे. राजमाता जिजाऊ यांच्या स्मरणार्थ सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमातून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जडणघडणीत असलेल्या त्यांच्या मोलाच्या योगदानाला आदरांजली वाहण्यात आली आहे. या नव्या योजनेअंतर्गत सुमारे ३ हजार बस राज्यभरात टप्प्याटप्प्याने दाखल होणार आहेत. प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी आणि आधुनिक सुविधा देण्यावर भर देण्यात आला आहे. एसटीच्या ताफ्यात यापूर्वी 'शिवनेरी', 'शिवशाही', 'शिवाई', 'हिरकणी' आणि 'यशवंती' या सेवांचा समावेश आहे. त्यात 'राजमाता जिजाऊ' ही सेवा नव्या पर्वाची सुरुवात मानली जात आहे.

लोकार्पण सोहळ्यात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बसचे पूजन करून फीत कापत या सेवेचा शुभारंभ केला. त्यानंतर मान्यवरांनी बसमधून प्रत्यक्ष प्रवास करत या सेवेला प्रारंभ दिला. यावेळी बससमोर घोड्यावर आरूढ झालेल्या राजमाता जिजाऊ यांच्या देखाव्यामुळे कार्यक्रमाला ऐतिहासिक आणि प्रेरणादायी रंग प्राप्त झाला.

या उपक्रमामुळे राज्यातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी मिळणार असून ग्रामीण व शहरी भागातील प्रवाशांना अधिक दर्जेदार सेवा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. 'राजमाता जिजाऊ' बस सेवा ही केवळ प्रवासाची सुविधा नसून महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेचा सन्मान करणारा एक महत्त्वाचा उपक्रम ठरत आहे.

# अल्पवयीनांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रणासाठी धोरण लवकरच

## माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिश शेलार यांची विधानसभेत माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील अल्पवयीन मुलांच्या सोशल मीडिया वापरावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने नेमलेल्या टास्क फोर्सच्या अहवालानंतरच ठोस धोरण किंवा कायदा तयार करण्यात येणार असल्याची माहिती माहिती तंत्रज्ञान मंत्री आशीष शेलार यांनी विधानसभेत दिली.

विधानसभेत सदस्य राजेश पवार यांनी सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या वाढत्या वापरामुळे मुलांवर होणाऱ्या दुष्परिणामांबाबत लक्षवेधी उपस्थित केली होती. त्यावर उत्तर देताना मंत्री शेलार यांनी सांगितले की, इतर राज्यांनी केवळ घोषणा केल्या असल्या तरी महाराष्ट्राने या विषयावर ठोस पावले उचलली आहेत. २ फेब्रुवारी २०२६ रोजी स्थापन करण्यात आलेल्या टास्क फोर्सकडून अल्पवयीन मुलांचा सोशल मीडिया वापर, त्याचे मानसिक, शारीरिक आणि शैक्षणिक परिणाम तसेच डिजिटल जाहिरातींचा प्रभाव यांचा सखोल अभ्यास केला जात आहे. यासोबतच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियमांचा अभ्यास करून योग्य कायदेशीर, तांत्रिक आणि प्रशासकीय उपाय सुचवले जाणार आहेत. मंत्री शेलार यांनी स्पष्ट केले की, १८ वर्षांखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर सरसकट बंदी घालणे व्यवहार्य नाही, कारण शिक्षणात इंटरनेटची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे संतुलित आणि व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून निर्णय घेतला जाईल. टास्क फोर्सला तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला असून, अहवालानंतर एज व्हेरिफिकेशन, स्क्रीन टाइम मर्यादा, डिजिटल सेफ्टी शिक्षण आणि जनजागृती यांसारख्या उपाययोजनांवर निर्णय होणार आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पिंपळवंडीत स्वच्छता अभियान; अडीच टन कचरा संकलित

**पिंपळवंडी :** डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, रेवदंडा यांच्या वतीने पिंपळवंडी येथील श्रीराम व श्रीकृष्ण मंदिर परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आले. पद्मश्री डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ७.३० पासून सुमारे १४०० चौरस मीटर परिसराची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमात अर्धा टन ओला व दोन टन सुका कचरा असा एकूण अडीच टन कचरा संकलित करण्यात आला. ट्रॅक्टर ट्रॉलीच्या साहाय्याने कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यात आली.यावेळी मंगेश काकडे, शरद लेंडे व सरपंच मेघा काकडे उपस्थित होते.

### माळवाडी : कचरा गाडी खरेदीवर गैरव्यवहाराचा आरोप

**पिंपळवंडी :** इंदापूर तालुक्यातील माळवाडी ग्रामपंचायतीत कचरा गाडी खरेदीच्या व्यवहारावरून वाद निर्माण झाला असून या खरेदीत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. माहितीनुसार, कचरा गाडी खरेदीसाठी शासनाकडून सुमारे ७.५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्ष खरेदी केलेल्या गाडीची किंमत सुमारे ३.९५ लाख रुपये असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय शोरूमचे कोटेशन केवळ ३.१२ लाख रुपये असल्याची माहिती समोर आल्याने निधी व खर्चात मोठा तफावत दिसून येत आहे. यामुळे व्यवहारात अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त होत असून ग्रामस्थांनी सखोल चौकशीची मागणी केली आहे. तसेच खरेदी केलेली गाडी नवीन आहे की जुनी, याबाबतही शंका उपस्थित करण्यात आली आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत असून या प्रकरणाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पंतप्रधान आवास योजनेतील शेकडो घरे अर्धवट; लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी

# स्पर्श प्रणालीमुळे घरकुलांचे हप्ते रखडले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत आंबेगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणावर घरकुलांना मंजुरी मिळूनही 'स्पर्श' वेतन प्रणालीमुळे हप्ते वितरणात होत असलेल्या विलंबामुळे शेकडो घरकुलांची कामे अर्धवट अवस्थेत ठप्प झाली आहेत. त्यामुळे लाभार्थ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सन २०२४-२५ मध्ये तालुक्यात २ हजार ५१९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून अनेक लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर त्यांनी उसनवारी करून घरबांधणी सुरू केली. मात्र, केंद्र शासनाने स्पर्श प्रणाली लागू केल्यानंतर गेल्या सहा ते सात महिन्यांपासून हप्ते आणि वेतन वितरणात मोठा अडथळा निर्माण झाला. मागील काही महिन्यांत हप्ते सुरू झाले असले, तरी प्रक्रिया अत्यंत किचकट झाल्याने प्रत्येक टप्प्यासाठी एक ते दोन महिने प्रतीक्षा करावी लागत आहे.



### प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी

● "घरकुलाचे स्वप्न पूर्ण होण्याऐवजी चिंता वाढली आहे. देयके मिळावीत म्हणून आम्ही वारंवार पंचायत समिती आणि बँकांच्या चकरा मारत आहोत. मात्र 'सिस्टममध्ये अडचण आहे' असे सांगून परत पाठवले जाते," असा आरोप लाभार्थ्यांनी केला असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

यामुळे अनेक घरकुलांची कामे अर्धवट राहिली असून बांधकाम ठप्प झाले आहे. हप्ते वेळेवर न मिळाल्याने लाभार्थ्यांची आर्थिक अडचण वाढली आहे. ते सतत आंबेगाव पंचायत समिती, घोडेगाव कार्यालय आणि बँकांच्या चकरा मारत आहेत. मात्र, ही प्रणाली केंद्र शासनाची असल्याने स्थानिक प्रशासनालाही मर्यादा येत असून कर्मचाऱ्यांनाही नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागत आहे. पूर्वी घरकुलाची प्रक्रिया पूर्ण होताच दोन दिवसांत लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होत होते. मात्र स्पर्श प्रणालीमुळे आता महिनोनमहिने प्रतीक्षा करावी लागत आहे. परिणामी तालुक्यात घरकुल पूर्ण होण्याचे प्रमाणही घटले आहे. दरम्यान, जिओ-ट्रॅकिंगनंतर पंचायत समिती स्तरावरून हप्ते मंजूर केले जात असले, तरी ते लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होण्यासाठी एक महिन्याहून अधिक कालावधी लागत आहे.

त्यानंतर पोर्टलवर पेमेंट दिसण्यासाठी आणखी ७ ते १५ दिवस लागतात. तोपर्यंत पुढील टप्प्याचे काम सुरू करता येत नाही. प्रत्येक टप्प्यात हीच प्रक्रिया पुन्हा सुरू होत असल्याने हप्ते दोन-दोन महिने रखडत आहेत.केंद्र शासनाचा उद्देश पारदर्शकता वाढवण्याचा असला, तरी अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक अडचणी आणि ट्रॅकिंग व्यवस्थेतील त्रुटींमुळे स्पर्श प्रणाली अपेक्षित परिणाम देत नसल्याचे चित्र आंबेगाव तालुक्यात दिसत आहे.

## ओतूर ग्रामीण रुग्णालय रखडले; संतप्त नागरिकांचा उपोषणाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील ओतूर येथे सुमारे १४ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेले ग्रामीण रुग्णालय अद्याप सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सुसज्ज इमारत, अत्याधुनिक सुविधा आणि यंत्रणा उपलब्ध असूनही डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीअभावी रुग्णालय गेल्या दीड ते दोन वर्षांपासून बंदच आहे. परिणामी, ओतूर पंचक्रोशीतील रुग्णांना उपचारासाठी जुन्नर, नारायणगाव, आळेफाटा तसेच पुणे शहराकडे धाव घ्यावी लागत आहे.

ओतूर परिसरातील सुमारे तीन लाख लोकसंख्येसाठी हे रुग्णालय अत्यंत महत्त्वाचे ठरणार होते. मात्र, सेवा सुरू नसल्याने अपघातग्रस्त, सर्पदंश, बिबट हल्ला, प्रसूती व इतर गंभीर रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. अनेकांना वेळेत उपचार न मिळाल्याने जीव गमवावा लागल्याच्या घटनाही समोर आल्या आहे. दरम्यान, रुग्णालयाच्या संरक्षक भिंतीचे कामही अतिक्रमणामुळे अपूर्ण राहिले आहे. कोट्यवधींचा खर्च करूनही प्रकल्प रखडल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागरिकांनी वारंवार निवेदने देऊन पाठपुरावा केला असतानाही ठोस निर्णय होत नसल्याने संताप वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर ओतूर ज्येष्ठ नागरिक संघाने १ मेपासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. "आता आश्वासन नको, रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय हवा," अशी ठाम भूमिका नागरिकांनी घेतली आहे.

## धामणी सिंचन योजनेला मिळणार वीजजोड; शेतकऱ्यांच्या आशा पल्लवीत

### महावितरणच्या मुख्य अभियंत्यांची प्रत्यक्ष पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** धामणी येथील शेतकऱ्यांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या उपसा सिंचन योजनेला अखेर वीजजोड मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार महावितरणचे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी सोमवारी (दि. २३) धामणीखिंड-ज्ञानेश्वर मंदिर परिसरात डिंभा धरणाच्या उजव्या कालव्यावर उभारण्यात आलेल्या सोलर प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी केली.

या पाहणीचा सविस्तर अहवाल लवकरच शासनाकडे सादर करण्यात येणार असून, त्यानंतर सिंचन योजनेस वीजपुरवठ्याबाबत सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. त्यामुळे अनेक महिन्यांपासून अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा जागृत झाल्या आहेत.

धामणी हे दुष्काळग्रस्त गाव असून येथील शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चातून कालव्याच्या पाण्यावर आधारित नऊ सामुदायिक उपसा सिंचन योजना उभारल्या आहेत. मात्र, वीजजोड न मिळाल्याने या योजना ठप्प पडल्या होत्या. परिणामी, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत होता.

या समस्येकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सुमारे ३०० शेतकऱ्यांनी एकदिवसीय उपोषण करत आंदोलन केले होते. त्यानंतर प्रशासन हलले असून आता प्रत्यक्ष पाहणी करण्यात आल्याने सकारात्मक घडामोडी सुरू झाल्या आहेत.

पाहणी दौऱ्यात अधीक्षक अभियंता युवराज जरग, कार्यकारी अभियंता राहुल गवारी, उपकार्यकारी अभियंता पुनम पांडकर, कनिष्ठ अभियंता हितेश गायकवाड, सहाय्यक अभियंता नितेश बसारकर यांच्यासह तांत्रिक कर्मचारी उपस्थित होते. तसेच पंचायत समितीचे माजी सदस्य रविंद्र करंजखेले, ग्रामपंचायत सदस्य प्रतिक जाधव, मंगेश नवले आणि स्थानिक शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी अधिकाऱ्यांसमोर मांडल्या.

या वेळी अधिकाऱ्यांनी सोलर प्रकल्पासह विहिरींची पाहणी करून परिस्थितीचा आढावा घेतला. यानंतर सिंचन योजनेसाठी वीजजोड देण्याचा मार्ग मोकळा होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

"आमच्या हक्काच्या पाण्यासाठी दिलेल्या लढ्याला आता यश मिळेल," अशी भावना व्यक्त करत शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले. वीजजोड मिळाल्यास सिंचन प्रकल्प सुरू होऊन शेतीला नवसंजीवनी मिळणार असल्याचे मतही त्यांनी मांडले.

## ओतूरमध्ये 'चिऊताई'साठी घरटे; चैतन्य विद्यालयाचा पर्यावरणपूरक उपक्रम

### जागतिक चिमणी दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी तयार केली घरटी; संवर्धनाचा संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर :** ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयात २० मार्च रोजी 'जागतिक चिमणी दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. राष्ट्रीय हरित सेना विभागाच्या माध्यमातून 'एक घरटे चिऊताईसाठी' हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी चिमण्यांच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष कृती करत पर्यावरण जागृतीचा संदेश दिला.

आजच्या डिजिटल युगात 'चिऊताई चिऊताई दार उघड' ही बालगीते आठवणीत राहिली असली, तरी प्रत्यक्षात चिमण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. एकेकाळी माणसाच्या घराजवळ सहज दिसणाऱ्या या पक्ष्यांची संख्या झपाट्याने घटत आहे. वाढते शहरीकरण, आधुनिक बांधकाम पद्धती, मोबाईल टॉवरमधून होणारे विद्युत् चुंबकीय उत्सर्जन, प्रदूषण तसेच शेतीतील रासायनिक खतांचा वाढता वापर यामुळे चिमण्यांना निवास आणि अन्नाचा तुटवडा भासत आहे.

या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी विद्यालयाने हा उपक्रम हाती घेतला. संतोष कांबळे यांनी विद्यार्थ्यांना चिमण्यांचे महत्त्व, त्यांची जीवनशैली आणि घटत्या संख्येमागील कारणे याविषयी सविस्तर माहिती दिली. "पर्यावरण वाचवू या आणि चिमण्या वाढवू या," असा संदेशही त्यांनी दिला.

उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी गवत, कागद, खोके आणि इतर उपलब्ध साहित्य वापरून चिमण्यांसाठी घरटी तयार केली. ही घरटी त्यांनी आपल्या घरांच्या बाहेर, भिंतींवर तसेच झाडांवर लावली. या कृतीतून विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनात सक्रिय सहभाग नोंदवला.

या कार्यक्रमास ग्राम विकास मंडळाचे सचिव प्रदीप गाढवे, पंकज घोलप, मुख्याध्यापिका राजश्री भालेकर, संजय हिरे, अनिल उकिरडे, अजित डांगे, भगवंता घोडे, राजाराम शिंदे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## भीमाशंकर गावठाण स्थलांतरास ग्रामस्थांची अटींसह संमती

### भाविकांच्या सुरक्षिततेसाठी निर्णय; पुनर्वसनात न्याय व उपजीविकेची हमी देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी :** भीमाशंकर मंदिर परिसरातील वाढती गर्दी आणि भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गावठाण स्थलांतराचा महत्त्वाचा निर्णय पुढे सरकत आहे. मंदिरालगत असलेले गावठाण सुमारे १०० मीटर अंतरावर हलवण्याच्या जिल्हा प्रशासनाच्या प्रस्तावाला स्थानिक ग्रामस्थांनी काही अटींवर संमती दर्शवली आहे.

भीमाशंकर हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ असल्याने वर्षभर लाखो भाविक येथे दर्शनासाठी येतात. विशेषतः कोरोना काळानंतर भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मंदिर परिसर आणि पायऱ्यांच्या मार्गाजवळ असलेली दाट वस्ती, अरुंद रस्ते आणि अपुरी जागा यामुळे विकासकामांना अडथळे निर्माण होत होते, तसेच गर्दीमुळे सुरक्षेचे प्रश्नही गंभीर होत होते.



दरम्यान, आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुमारे एक लाख भाविकांच्या आगमनाची शक्यता व्यक्त होत आहे. संभाव्य चेंगराचेंगरी किंवा आगीसारख्या दुर्घटना टाळण्यासाठी सुमारे ११० घरे सुनियोजित ठिकाणी स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव प्रशासनाने मांडला होता. यासंदर्भात देवस्थान ट्रस्ट कार्यालयात झालेल्या बैठकीत ग्रामस्थांनी सविस्तर चर्चा करून प्रस्तावास तत्त्वतः मंजुरी दिली. मात्र, या स्थलांतर प्रक्रियेत ग्रामस्थांना न्याय मिळावा, पुनर्वसन करताना त्यांना विश्वासात घेण्यात यावे, तसेच पिढ्यान्पिढ्या येथे व्यवसाय करणाऱ्या बेलफुल-प्रसाद विक्रेते, डोलीवाले, मार्गदर्शक आणि लहान दुकानदार यांच्या उपजीविकेचा विचार करावा, अशी ठाम मागणी ग्रामस्थांनी केली.

भोरगिरी-भीमाशंकरचे सरपंच दत्तात्रय हिले यांनी सांगितले की, "भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि मंदिर परिसराच्या विकासासाठी स्थलांतर आवश्यक आहे. या प्रस्तावासंदर्भातील लेखी निवेदन सरपंच दत्तात्रय हिले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येणार आहे. बैठकीस देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. सुरेश कौदरे, उपकार्यकारी विश्वस्त मधुकर शास्त्री गवांदे, विश्वस्त सदस्य तसेच टपरी संघटनेचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निर्णयामुळे भविष्यात भीमाशंकर परिसरातील विकासाला गती मिळण्याची शक्यता असून, भाविकांसाठी अधिक सुरक्षित आणि सुसज्ज व्यवस्था निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## ओतूरमध्ये रंगला लक्षवेधी महिला कुस्ती आखाडा

### कवठे येमाई यात्रेनिमित्त भव्य आयोजन; सोनाली मंडलिकचा मानाचा किताब

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**ओतूर (ता. जुन्नर) :** ओतूर येथील श्री कवठे येमाई यात्रा उत्सव उत्साहात सुरू असून, यात्रेच्या सातव्या दिवशी भरविण्यात आलेला महिला कुस्ती आखाडा विशेष आकर्षण ठरला. रविवारी (दि. २२) दुपारी पार पडलेल्या या आखाड्यात देशभरातील महिला मल्लांनी दमदार कामगिरी करत प्रेक्षकांची मने जिंकली.

जय बजरंग सेवा गणेश मंडळ व यात्रा समितीच्या वतीने महिलांसाठी खास आखाड्याचे आयोजन करण्यात आले होते. हजारो प्रेक्षकांच्या उपस्थितीत रंगलेल्या या स्पर्धेत प्रत्येक कुस्ती चुरशीची ठरली. विजेत्या महिला मल्लांना २ हजार ते २५ हजार रुपयांपर्यंत रोख पारितोषिक देण्यात आले. याशिवाय प्रेक्षकांकडूनही प्रत्येक कुस्तीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत स्वतंत्र बक्षिसांची उधळण करण्यात आली.

आखाड्याची मानाची शेवटची कुस्ती विशाखा चव्हाण (ऑलिम्पिक मिशन गोल्ड, जुन्नर) आणि सोनाली मंडलिक (सिनियर नॅशनल गोल्ड, पुणे) यांच्यात रंगली. या चुरशीच्या लढतीत सोनाली मंडलिक हिने नेत्रदीपक खेळ सादर करत विशाखाला चितपट केले आणि गदा तसेच २५ हजार रुपयांचे पारितोषिक पटकावले.

या आखाड्यासाठी पुणे, ठाणे, नाशिक, अहिल्यानगर, संगमनेर, कोल्हापूर, मुंबई, दिल्ली तसेच हरियाणासारख्या राज्यांतून नामांकित महिला मल्लांनी सहभाग घेतला होता. राष्ट्रीय स्तरावर पारितोषिक मिळवलेल्या खेळाडूंच्या उपस्थितीमुळे स्पर्धेचा दर्जा अधिक उंचावला. मल्लांनी विविध डावपेच, ताकद आणि कौशल्य यांचा उत्कृष्ट संगम सादर करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. प्रत्येक फेरीसोबत आखाड्यातील उत्साह द्विगुणित होत गेला. महिला कुस्तीबद्दलचा वाढता उत्साह आणि सहभाग यामुळे हा आखाडा विशेष ठरला. या वेळी माजी जिल्हा परिषद सदस्य तुषार थोरात, उद्योजक जालिंदर पानसरे, शांतु अण्णा तांबे, नीलम तांबे, संतोष तांबे, नितीन डुंबरे, निलेश तांबे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जे.पी. ढमाले यांनी केले, तर विठ्ठल शितोळे यांनी निवेदन सादर केले. या भव्य आखाड्यामुळे ओतूर परिसरात कुस्तीप्रेमींमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला असून, महिला मल्लांच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## भीमाशंकर अभयारण्यात पारदर्शकतेवर भर; प्रत्येक गावात स्वतंत्र बैठका घेणार

# ग्रामस्थांसमोर मांडणार समित्यांचा लेखाजोखा; वनविभागाची ग्वाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अवसरी :** भीमाशंकर अभयारण्य परिसरातील ग्रामपरिस्थिती विकास समित्यांच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात येत असून, सर्व शासकीय तसेच बचत खात्यांशी संबंधित दस्तावेज ग्रामस्थांसमोर सादर केले जाणार आहेत. पुढील आठवड्यात प्रत्येक गावात स्वतंत्र बैठका घेऊन हे दस्तावेज नागरिकांसाठी उपलब्ध करून दिले जातील, अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी रणजित जाधव यांनी दिली.

मंगळवारी (ता. ६) भीमाशंकर अभयारण्य वनपरिक्षेत्र कार्यालयात आयोजित बैठकीत आठ गावांतील ग्रामस्थ व युवकांनी वनविभागाच्या कामकाजाबाबत विविध मुद्द्यांवर आपली भूमिका ठामपणे मांडली. विशेषतः निगडाळे ग्रामपरिस्थिती विकास समितीच्या बचत खात्याबाबत ग्रामस्थांनी आक्षेप नोंदवत पारदर्शकतेची मागणी केली.



समितीमध्ये वनरक्षक यांची 'सदस्य सचिव' म्हणून नियुक्ती करण्यात आल्याबाबतही ग्रामस्थांनी प्रश्न उपस्थित केला. ही नियुक्ती ग्रामसभेची लेखी मंजुरी न घेता करण्यात आल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. यावर उत्तर देताना वनपरिक्षेत्र अधिकारी जाधव यांनी संबंधित नियुक्ती कोणत्या शासकीय नियमांनुसार करण्यात आली आहे, याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून लेखी स्वरूपात देण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीत निगडाळे ग्रामपरिस्थिती विकास समितीच्या अध्यक्षा अनिता लोहकरे, हरिश्चंद्र लोहकरे, करण कोंढवळे, खंडू बाणेरे, लहू मेठल, रोहन बाणेरे, ओंकार बाणेरे, दीपक बांगर, अजय सोनवणे, अजित काठे, गणेश सुपे, अजित कवटे, सचिन कारोटे यांसह अनेक सदस्य उपस्थित होते. तसेच घोडेगाव पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारीही बैठकीला उपस्थित होते. बैठकीत ग्रामपरिस्थिती विकास समित्यांचा कारभार, निधी व्यवस्थापन, स्थानिकांचा सहभाग आणि कामकाजातील पारदर्शकता या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. ग्रामस्थांनी निधीच्या वापराबाबत स्पष्ट लेखाजोखा सादर करण्याची मागणी केली, तसेच समित्यांच्या नियमित बैठका घेण्यावरही भर दिला.

वनविभागाकडून भविष्यातील सर्व वनविकास कामांमध्ये स्थानिक ग्रामस्थांचा सक्रीय सहभाग सुनिश्चित केला जाईल, अशी ग्वाही देण्यात आली. तसेच प्रत्येक गावात समित्यांच्या नियमित बैठका घेऊन निर्णय प्रक्रियेत नागरिकांना सहभागी करून घेण्याची तयारी दर्शविण्यात आली.

या निर्णयामुळे भीमाशंकर अभयारण्य परिसरातील ग्रामस्थांमध्ये विश्वास निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. पारदर्शक कारभार आणि स्थानिक सहभाग यांमुळे वनविकासाच्या कामांना गती मिळण्यासोबतच ग्रामस्थ आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक दृढ होणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## मुथाळणे घाटात पिकअप उलटली; ३७ मजूर जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** जुन्नर तालुक्यातील मुथाळणे घाटात रविवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास शेतमजुरांना घेऊन जाणारी पिकअप उलटून झालेल्या अपघातात तब्बल ३७ मजूर जखमी झाले. त्यापैकी एका मजुराची प्रकृती गंभीर असून इतरांवर ओतूर व आळेफाटा येथील रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोले तालुक्यातील सातेवाडी व उंबरेवाडी परिसरातील मजूर जुन्नर तालुक्यातील बनकरफाटा व उदापूर भागात कामासाठी आले होते. रविवारी काम आटोपून परतत असताना मुथाळणे घाटातील वाघोबा मंदिराजवळील अवघड वळणावर पिकअप (क्र. एमएच ४२ एम ५७३३) चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन उलटले. या अपघातात रामदास घोडे (वय ३५) गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर आळेफाटा येथे उपचार सुरू आहेत. अन्य जखमींमध्ये महिलांसह अनेक मजुरांचा समावेश असून त्यांच्यावर ओतूर येथील निरामय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

अपघातानंतर स्थानिकांनी तत्काळ मदतकार्य करत जखमींना रुग्णालयात दाखल केले. या घटनेनंतर मजुरांच्या वाहतुकीतील असुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. आर्थिक अडचणींमुळे ग्रामीण भागातील मजुरांना अशा धोकादायक वाहनांमधून प्रवास करावा लागत असल्याने अपघातांचा धोका वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## सारांश वृत्त

### राजस्थानसरकारचेही सेमीकंडक्टर धोरण

**जयपूर :** राजस्थान सरकारने मंगळवारी सेमीकंडक्टर धोरण जाहीर केले, ज्यामुळे राज्यात गुंतवणूक, रोजगार आणि तांत्रिक नावीन्यपूर्णतेला चालना मिळेल. एका अधिकृत निवेदनानुसार, या धोरणात राजस्थानला सेमीकंडक्टर उत्पादन आणि संबंधित उद्योगांचे प्रमुख केंद्र म्हणून स्थान देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. हे संशोधन, डिझाइन, उत्पादन, चाचणी आणि पॅकेजिंगचा समावेश असलेल्या सर्वसमावेशक सेमीकंडक्टर इकोसिस्टम विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करते आणि आउटसोर्स सेमीकंडक्टर असेंब्ली आणि टेस्टिंग (ओएसएटी) सारख्या क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्याचे उद्दीष्ट ठेवते; असेंब्ली, टेस्टिंग, मार्किंग आणि पॅकेजिंग (एटीएमपी) आणि सेन्सर मॅन्युफॅक्चरिंग, असे निवेदनात म्हटले आहे.

-

### एलपीजीच्या कमतरतेमुळे बीआरएसचे आंदोलन

**हैदराबाद:** हैदराबाद राज्यात एलपीजी सिलिंडरचा तुटवडा असल्याच्या आरोपावरून विरोधी पक्षांच्या बीआरएस आमदारांनी मंगळवारी येथे निदर्शने केली. बीआरएसचे आमदार, आमदार आणि पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष के. टी. रामाराव यांनी तेलंगणा हुतात्मा स्मारकावर राज्य विधानसभेसमोर जमले आणि गॅस सिलिंडरच्या आकाराचे फलक घेऊन निषेध केला आणि वाढत्या किंमतींबद्दल चिंता व्यक्त केली.

### ५० हजार जवानांना ड्रोनचे प्रशिक्षण

**शिमला :** आधुनिक तंत्रज्ञानाचे महत्त्व आणि आजच्या युद्धात ड्रोनची वाढती भूमिका यावर जोर देत आर्मी ट्रेनिंग कमांड (एआरटीआरएसी) चे जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ लेफ्टनंट जनरल देवेंद्र शर्मा यांनी मंगळवारी सांगितले की, आतापर्यंत ५० हजारांहून अधिक जवानांना ड्रोन ऑपरेशन्समध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे. नवी दिल्ली येथे आयोजित एआरटीआरएसी अलंकरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना त्यांनी कौशल्याची केंद्रे विकसित करणे, ऑनलाइन प्रशिक्षण आणि परीक्षा प्रणाली सुरू करण्यासाठी लष्कराच्या प्रयत्नांवर प्रकाश टाकला.

## सरकारवर विरोधकांची टीका; सत्ताधाऱ्यांचा ठाम बचाव

# लोकसभेत वित्त विधेयकावर जोरदार खडाजंगी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**एफडीआय व परदेशी गुंतवणूक घटली, विरोधकांचा आरोप**

- घटल्याचा विरोधकांचा आरोप
- रुपयाचे अवमूल्यन व आर्थिक मंदीचा मुद्दा
- अमेरिकेसोबतच्या व्यापार करारावरून चिंता
- रशियाकडील तेल खरेदी कमी केल्याचा आरोप
- सरकारच्या कल्याणकारी योजनांचे सत्ताधाऱ्यांकडून समर्थन

**नवी दिल्ली :** वित्त विधेयक २०२६ वर लोकसभेत मंगळवारी झालेल्या चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी रंगली. अर्थव्यवस्थेची दिशा, परराष्ट्र धोरण, गुंतवणूक आणि सामाजिक न्याय या मुद्द्यांवर दोन्ही बाजूंनी परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करत सभागृहात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

काँग्रेस खासदार मनीष तिवारी यांनी सरकारच्या आर्थिक धोरणांवर कडक टीका करत थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) आणि परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणुकीत घट झाल्याचा आरोप केला. रुपयाचे अवमूल्यन रोखण्यात सरकार अपयशी ठरल्याचे सांगत त्यांनी देशातील आर्थिक वाढीचा वेग मंदावल्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच, अमेरिकेसोबतच्या प्रस्तावित व्यापार करारामुळे भारतीय बाजारपेठ अमेरिकन कृषी उत्पादनांसाठी खुली होण्याचा धोका असल्याचेही त्यांनी नमूद केले. तिवारी यांनी परराष्ट्र धोरणावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत भारताने अमेरिकेच्या दबावाखाली रशियाकडून तेल खरेदी कमी केल्याचा आरोप केला. यामुळे देशाच्या सामरिक स्वायत्ततेला धक्का बसत असल्याचे त्यांनी म्हटले. पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाचा भारतावर काय परिणाम होणार, याबाबतही त्यांनी सरकारकडून स्पष्ट भूमिका मागितली.

या आरोपांना उत्तर देताना भाजप खासदार नवीन जिंदाल यांनी विरोधकांवर तथ्यांशिवाय टीका केल्याचा आरोप करत सरकारच्या कामगिरीचे जोरदार समर्थन केले. त्यांनी सांगितले की, केंद्र सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा थेट लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत आहे. तसेच भारताची अर्थव्यवस्था सध्या जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असल्याचा दावा त्यांनी केला.

जेडीयूचे रामप्रीत मंडल यांनीही एनडीए सरकारच्या धोरणांचे समर्थन करत सर्वांगीण विकासासाठी घेतलेल्या निर्णयांचे कौतुक केले. विशेषतः बिहारसारख्या राज्यांच्या औद्योगिकीकरणासाठी अधिक प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, समाजवादी पक्ष, काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी वाढती आर्थिक विषमता, बेरोजगारी, कररचना आणि सार्वजनिक उपक्रमांच्या निर्गुंतवणुकीवर सरकारवर टीकेची झोड उठवली. काही सदस्यांनी भारताची परराष्ट्र धोरणे अमेरिकेकडे झुकत असल्याचा आरोप करत स्वायत्ततेवर प्रश्न उपस्थित केले.

तेलंगणातील काँग्रेस खासदार वामसी कृष्णा गड्डम यांनी दलित उद्योजकांना कर सवलती देण्याची मागणी केली. तर टीडीपीचे लवू श्री कृष्ण देवरायालू यांनी अर्थव्यवस्था मजबूत असली, तरी कर प्रणालीतील अडचणी दूर करण्याची गरज अधोरेखित केली. एकूणच, वित्त विधेयक २०२६ वरील चर्चेत देशाच्या आर्थिक आणि धोरणात्मक दिशेबाबत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तीव्र मतभेद उघड झाले. आगामी काळात या विधेयकावर होणाऱ्या निर्णयाकडे देशाचे लक्ष लागले आहे.ननरन

# पश्चिम आशिया संकटावर आज सर्वपक्षीय बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या तीव्र संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने बुधवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत सध्याच्या परिस्थितीचा आढावा घेऊन देशाच्या आर्थिक, सुरक्षा आणि परराष्ट्र धोरणावर होणाऱ्या परिणामांवर चर्चा होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी संसदेत या संघर्षाबाबत चिंता व्यक्त करत तो भारतासमोर "अभूतपूर्व आव्हाने" निर्माण करणारा असल्याचे म्हटले होते. त्यांनी विशेषतः आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवतावादी परिणामांचा उल्लेख केला होता. पश्चिम आशियातील देशांशी भारताचे घनिष्ठ व्यापारी संबंध असून देशाच्या कच्च्या तेल आणि वायूच्या गरजांचा मोठा भाग या प्रदेशातून पूर्ण होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, मंगळवारी संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक पार पडली. या बैठकीत देशाच्या संरक्षण सज्जतेचा आणि बदलत्या जागतिक परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान, एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग, जनरल उपेंद्र द्विवेदी, ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी, तसेच संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे अध्यक्ष समीर कामत यांसह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. पश्चिम आशियातील संघर्षाने आता चौथ्या आठवड्यात प्रवेश केला असून होर्मुझ सामुद्रधुनीतील व्यापार मार्ग मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाले आहेत. अमेरिका-इस्रायलच्या हल्ल्यांनंतर सुरू झालेल्या या संघर्षाचे स्वरूप अधिक गंभीर बनले आहे. इराणनेही प्रत्युत्तरादाखल आखाती देशांतील अमेरिकन व इस्रायली हितसंबंधांवर हल्ले केल्याने तणाव अधिक वाढला आहे. या पार्श्वभूमीवर जागतिक ऊर्जा बाजारपेठेवर तसेच आर्थिक स्थैर्यावर परिणाम होत असून भारतासाठीही परिस्थिती संवेदनशील बनली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावून व्यापक राजकीय एकमत साधण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

# निवडणूक आयोगावर नियंत्रण कोणाचे?

## भाजपच्या 'शिक्क्या'वरून ममता बॅनर्जींचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवरून नवा वाद पेटला असून मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी आयोगावर अप्रत्यक्षपणे भाजपचा प्रभाव असल्याचा गंभीर आरोप केला आहे. निवडणूक आयोगाच्या एका पत्रावर भाजपचा कथित रबर स्टॅम्प आढळल्याने हा वाद उफाळून आला आहे.

कोलकाता विमानतळावर पत्रकारांशी बोलताना बॅनर्जी म्हणाल्या की, "निवडणूक आयोगाच्या कागदपत्रांवर भाजपचा शिक्का दिसणे ही साधी चूक नसून पडद्यामागून कोण नियंत्रण ठेवत आहे, याचे स्पष्ट संकेत आहेत." आयोगाची तटस्थता संशयास्पद असल्याचा दावा त्यांनी पुन्हा अधोरेखित केला. मार्च २०१९ मधील एका पत्रव्यवहारात भाजपच्या केरळ युनिटचा शिक्का असल्याचे समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. हे पत्र सर्व राज्यांतील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पाठविण्यात आले होते, असे सांगत बॅनर्जी यांनी ही बाब "जाणूनबुजून केलेली कृती" असल्याचा आरोप केला. दरम्यान, निवडणूक आयोगाने राज्यातील मोठ्या प्रमाणावर अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्यानेही वाद अधिकच वाढला आहे. सोमवारी ७३ निवडणूक अधिकाऱ्यांच्या बदल्यांसह यापूर्वी मुख्य सचिव, गृह सचिव, पोलीस महासंचालक आणि कोलकाता पोलीस आयुक्तांसह अनेक वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली होती.

नंदीग्रामशी संबंधित एका अधिकाऱ्याची भवानीपूर येथे बदली केल्याचा मुद्दा उपस्थित करत बॅनर्जी यांनी हे "राजकीय षडयंत्र" असल्याचे म्हटले.

# धर्मांतरानंतर एससी दर्जा संपुष्टात; सर्वोच्च न्यायालयाचा निकाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर धर्म स्वीकारणाऱ्या व्यक्तीस अनुसूचित जाती (एससी) दर्जा मिळू शकत नाही, तसेच एससी/एसटी (अत्याचार प्रतिबंध) कायद्यांतर्गत संरक्षणाचाही दावा करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिला. न्यायमूर्ती पी. के. मिश्रा आणि एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना स्पष्ट केले की, अनुसूचित जातीचा दर्जा हा विशिष्ट धार्मिक ओळखीशी निगडित असून हिंदू, शीख आणि बौद्ध धर्मापुरताच मर्यादित आहे. इतर कोणत्याही धर्मात धर्मांतर केल्यास हा दर्जा आपोआप रद्द होतो. हा निर्णय चिंथडा आनंद या पाद्रीने दाखल केलेल्या अपीलावर देण्यात आला. आनंद यांनी आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाच्या मे २०२५ मधील निर्णयाला आव्हान दिले होते. त्यांनी काही व्यक्तींनी जातीय अत्याचार केल्याचा आरोप करत एससी/एसटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. मात्र, त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यामुळे त्यांना एससी दर्जा लागू होत नसल्याचे सांगत उच्च न्यायालयाने एफआयआर रद्द केला होता. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत नमूद केले की, संबंधित व्यक्ती ख्रिस्ती धर्माचे सक्रिय पालन करत होती आणि दीर्घकाळ पाद्री म्हणून कार्यरत होती. त्यामुळे घटनेच्या वेळी ती अनुसूचित जातीचा सदस्य मानता येत नाही. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, केवळ अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र असणे पुरेसे नसून प्रत्यक्ष धार्मिक ओळख महत्त्वाची ठरते. जर संबंधित व्यक्तीने पुन्हा मूळ धर्मात पुनर्धर्मांतर केले असल्याचे सिद्ध झाले नाही, तर एससी दर्जा लागू राहत नाही. या निकालामुळे धर्मांतर आणि अनुसूचित जातीचा कायदेशीर दर्जा याबाबतची भूमिका अधिक स्पष्ट झाली असून, घटनात्मक संरक्षणासाठी पात्रता ठरविताना धर्म हा निर्णायक घटक असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# तृतीयपंथी विधेयकावर राहुल गांधींची टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** केंद्र सरकारच्या तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) दुरुस्ती विधेयक २०२६ वर काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला असून, हे विधेयक ट्रान्सजेंडर समुदायाच्या घटनात्मक हक्कांवर आणि ओळखीवर घाला असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. राहुल गांधी यांनी या विधेयकाला "प्रतिगामी" संबोधत केंद्र सरकार राज्यघटनेच्या मूलभूत तत्त्वांचे उल्लंघन करत असल्याचा आरोप केला. या विधेयकामुळे तृतीयपंथी व्यक्तींना स्वतःची ओळख निश्चित करण्याचा अधिकार मर्यादित होईल, तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्वीच्या निर्णयांनाही धक्का बसतो, असे त्यांनी म्हटले. ते म्हणाले की, प्रस्तावित कायद्यात तृतीयपंथी व्यक्तींना वैद्यकीय मंडळासमोर तपासणीस सामोरे जाण्याची सक्ती केली जात आहे, जे मानवी सन्मानाला धक्का देणारे आहे.

याशिवाय, समुदायाच्या विविध सांस्कृतिक ओळखीवरही यामुळे परिणाम होऊ शकतो. काँग्रेसने आरोप केला की, या विधेयकाच्या तयारीत तृतीयपंथी समुदायाशी कोणतीही व्यापक सल्लामसलत करण्यात आलेली नाही. उलट, संरक्षण देण्याऐवजी हे विधेयक त्यांना अधिक कलंकित करणारे असल्याचे पक्षाचे मत आहे. दरम्यान, या विधेयकात 'तृतीयपंथी' या संज्ञेची स्पष्ट व्याख्या करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तसेच, ओळख निश्चित करण्यासाठी मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली वैद्यकीय मंडळ स्थापन करण्याची तरतूदही करण्यात आली आहे. वनन

## सर्वोच्च न्यायालयाचा पेन्शन हक्काचा ऐतिहासिक निर्णय

# महिला एसएससी अधिकाऱ्यांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** लष्कर, नौदल आणि हवाई दलातील शॉर्ट सर्व्हिस कमिशन (एसएससी) अंतर्गत कार्यरत असलेल्या आणि पर्मनंट कमिशन (पीसी) नाकारण्यात आलेल्या महिला अधिकाऱ्यांना मोठा दिलासा देत सर्वोच्च न्यायालयाने त्यांना पूर्ण पेन्शनरी लाभ देण्याचा ऐतिहासिक निर्णय मंगळवारी दिला. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती उज्वल भुयान आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना संविधानातील कलम १४२ अंतर्गत असाधारण अधिकारांचा वापर केला. न्यायालयाने स्पष्ट केले की, संबंधित महिला अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष सेवेतून मुक्त करण्यात आले असले तरी त्यांनी पेन्शनसाठी आवश्यक असलेली २० वर्षांची पात्रता सेवा पूर्ण केल्याचे गृहीत धरले जाईल. विंग कमांडर सुचेता एडन आणि इतरांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी करताना हा निर्णय देण्यात आला. या याचिकांमध्ये २०१९ नंतर लागू करण्यात आलेल्या धोरणात्मक बदलांमुळे स्थायी कमिशन नाकारण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. न्यायालयाने आपल्या निरीक्षणात म्हटले की, महिला अधिकाऱ्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालांमध्ये पूर्वग्रह दिसून येतो. अनेकदा त्यांच्या करिअर प्रगतीची शक्यता गृहीत धरली जात नसल्याने त्यांच्या गुणवत्तेचे मूल्यमापन कमी लेखले गेले. या पद्धतीमुळे त्यांच्या पदोन्नती व स्थायी कमिशनच्या संधींवर विपरीत परिणाम झाला. विशेषतः हवाई दलाच्या बाबतीत २०१९ मध्ये लागू केलेले 'सेवा कालावधी' आणि 'किमान कामगिरी' निकष अचानक लागू करण्यात आल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यामुळे अधिकाऱ्यांना त्या निकषांची पूर्तता करण्यासाठी पुरेसा कालावधी मिळाला नाही. न्यायालयाने आदेश दिला की, २०१९, २०२० आणि २०२१ या काळात स्थायी कमिशनसाठी विचारात घेतलेल्या सर्व महिला एसएससी अधिकाऱ्यांना २०२१ मध्ये सेवामुक्त झालेल्यांसह २० वर्षांची सेवा पूर्ण झाल्याचे गृहीत धरले जाईल. या आधारावर १ नोव्हेंबर २०२५ पासून त्यांच्या पेन्शनची गणना करण्यात यावी. मात्र, न्यायालयाने 'ऑपरेशनल परिणामकारकता'चा विचार करून संबंधित अधिकाऱ्यांना पुन्हा सेवेत घेण्याचा आदेश दिला नाही. तरीही आर्थिक हक्क नाकारणे योग्य ठरणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले. दरम्यान, केंद्र सरकारने आपल्या बाजूने युक्तिवाद करताना निवड प्रक्रिया लिंग-तटस्थ असल्याचे सांगितले होते.

# अमेरिका-इराण तणाव तीव्र; चर्चा दाव्यांवरून वाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील संघर्ष अधिकच तीव्र होत असताना अमेरिका आणि इराण यांच्यातील संभाव्य चर्चांबाबत विरोधाभासी दावे समोर येत आहेत. एका बाजूला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत व्यापक करारासाठी चर्चा सुरू असल्याचा दावा केला आहे, तर दुसरीकडे तेहरानने अशा कोणत्याही चर्चेला ठाम नकार दिला आहे. ट्रम्प यांनी म्हटले की, "इराणला आता सेटल व्हायचे आहे. त्यांना शांतता हवी आहे," असे सांगत चर्चा सकारात्मक दिशेने सुरू असल्याचे सूचित केले. मात्र, इराणच्या संसदीय नेतृत्वाने हे दावे फेटाळत त्यांना "बनावट बातम्या" ठरवले असून, तेल बाजारात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे. दरम्यान, संघर्षाची तीव्रता कमी झालेली नसून मंगळवारी पहाटे इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला केल्याची माहिती समोर आली. इस्रायलच्या उत्तरेकडील भागात काही इमारतींचे नुकसान झाले, मात्र जीवितहानी टळल्याचे वृत्त आहे. तणावाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्यासाठी दिलेली मुदत आणखी पाच दिवसांनी वाढवली आहे. तसेच इराणच्या उर्जा प्रकल्पांवर संभाव्य हल्ले काही काळ स्थगित ठेवण्याची घोषणा केली. या निर्णयाचा परिणाम म्हणून आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किंमती सुमारे ११ टक्क्यांनी घसरल्या. तथापि, अमेरिकेच्या सेंट्रल कमांडने स्पष्ट केले आहे की इराणमधील लक्ष्यांवर कारवाया सुरूच आहेत. दुसरीकडे, इराणकडून ड्रोन आणि क्षेपणास्त्रांच्या माध्यमातून बहरीन, सौदी अरेबिया आणि कुवेतसह आखाती देशांना लक्ष्य केले जात असल्याचेही समोर आले आहे. या संघर्षात इस्रायलने लेबनॉनची राजधानी बैरूतवर हवाई हल्ले तीव्र केले आहे.

## झोमॅटोच्या पाठोपाठ स्विगीचीही दरवाढ

**नवी दिल्ली :** ऑनलाइन फूड डिलिव्हरी क्षेत्रात स्पर्धा तीव्र होत असतानाच स्विगीने ग्राहकांकडून आकारल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्म फीमध्ये वाढ केली आहे. कंपनीने ही फी सुमारे १७ टक्क्यांनी वाढवून आता प्रति ऑर्डर १७.५८ रुपये (जीएसटीसह) इतकी केली आहे. गेल्या वर्षी सप्टेंबरमध्येही स्विगीने प्लॅटफॉर्म फी वाढवली होती. वाढत्या ऑपरेशनल खर्च, डिलिव्हरी नेटवर्कचा विस्तार आणि नफ्याचा दबाव लक्षात घेता कंपनीने पुन्हा दरवाढ केल्याचे मानले जात आहे.

# घुसखोरी रोखा, समाज एकत्र ठेवा - सरसंघचालक डॉ. मोहन भागवत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान :** स्लग - लखनौ बेकायदेशीर घुसखोरी, धर्मांतर आणि लोकसंख्येचे बदलते चित्र याकडे गंभीरतेने पाहण्याची गरज असल्याचे सांगत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी समाजाने अधिक सजग राहण्याचे आवाहन केले. वृंदावन येथील 'जीवनदीप आश्रम' उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत म्हणाले की, देशात परदेशी घुसखोरांची ओळख पटवून त्यांना रोजगाराच्या संधी मिळू नयेत यासाठी समाजाने सतर्क राहणे आवश्यक आहे. अशा व्यक्तींची माहिती प्रशासनाला देणे हीही नागरिकांची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. लोकसंख्या आणि कौटुंबिक रचनेच्या संदर्भात त्यांनी तीन मुलांच्या धोरणाला पाठिंबा दर्शविला. संतुलित सामाजिक विकासासाठी कुटुंबात किमान तीन मुले असणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी कमी जन्मदर हा दीर्घकालीन धोका ठरू शकतो, असा इशाराही दिला. अनेक देशांनी घटत्या लोकसंख्येमुळे जन्मदर वाढवण्यासाठी प्रयत्न सुरू केल्याचे त्यांनी नमूद केले. धर्मांतराच्या मुद्द्यावर बोलताना भागवत म्हणाले की, जबरदस्तीने होणारे धर्मांतर रोखणे आवश्यक आहे. यासाठी केवळ कायदा पुरेसा नसून समाजानेही पुढाकार घेतला पाहिजे. इतर धर्म स्वीकारलेल्यांपैकी अनेक जण मूळ हिंदू असल्याचे सांगत, इच्छुकांचे पुन्हा स्वागत केले जावे, असे त्यांनी सुचविले.

## लष्करी सामर्थ्य, तंत्रज्ञान प्रगती आणि सामरिक महत्त्वामुळे पुन्हा चर्चेत

# इस्रायल : इतिहास, संघर्ष आणि जागतिक राजकारणातील प्रभावी स्थान

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर इस्रायल या राष्ट्राचा इतिहास, लष्करी ताकद आणि जागतिक राजकारणातील भूमिका पुन्हा चर्चेत आली आहे. अवघे सुमारे २२ हजार चौरस किलोमीटर क्षेत्रफळ असलेला हा देश शत्रुत्वपूर्ण वातावरणातही टिकून राहून प्रगती करणारे एक वैशिष्ट्यपूर्ण उदाहरण मानला जातो.

१९४८ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर लगेचच शेजारी देशांकडून हल्ल्यांना सामोरे जावे लागले. मात्र इस्रायली संरक्षण दल यांनी अत्यल्प साधनसामग्री असूनही संघटित लढाऊ क्षमतेच्या बळावर राष्ट्राचे संरक्षण केले. नागरिकांचा सहभाग, शिस्तबद्ध लष्करी तयारी आणि वेगवान निर्णयक्षमता ही इस्रायलची ताकद ठरली.

इतिहासाच्या दृष्टीने पाहता, इस्रायलची मुळे धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेत खोलवर रुजलेली आहेत. मोशे आणि राजा डेव्हिड यांच्या कथांमधून यहुदी समाजाच्या संघर्षशीलतेची जडणघडण झाली. 'दहा आज्ञा'सारख्या नैतिक संकल्पनांनी आधुनिक लोकशाही विचारांवरही प्रभाव टाकल्याचे मानले जाते.

लष्करी धोरणाच्या बाबतीत इस्रायलने पारंपरिक पद्धतीऐवजी तंत्रज्ञानाधारित आणि चपळ रणनीती स्वीकारली आहे. १९६७ च्या युद्धापासून ते आधुनिक काळातील आयर्न डोमसारख्या संरक्षण यंत्रणांपर्यंत इस्रायलने 'असममित युद्ध' संकल्पना प्रभावीपणे राबवली आहे. त्यामुळे लहान देश असूनही तो मोठ्या शक्तींना तोलून धरू शकतो. जागतिक स्तरावर यहुदी समाजावरील अँटीसेमिटिझम अजूनही पूर्णपणे संपलेला नाही. त्यामुळे इस्रायलचा प्रश्न केवळ प्रादेशिक न राहता जागतिक स्वरूप धारण करतो. विविध देशांतील तणाव आणि हिंसक घटना यामुळे या मुद्द्याचे गांभीर्य वाढले आहे.

रणनीतिकदृष्ट्या, इस्रायल गुप्तचर माहिती, सायबर सुरक्षा, लष्करी तंत्रज्ञान आणि दहशतवादविरोधी उपाययोजनांमध्ये आघाडीवर आहे. कृषी, पाणी व्यवस्थापन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्टार्टअपच्या क्षेत्रातही या देशाने मोठी झेप घेतली आहे. त्यामुळे तो जागतिक नवोन्मेष केंद्रांपैकी एक मानला जातो.

भारतासाठीही इस्रायल महत्त्वाचा भागीदार ठरला आहे. संरक्षण, कृषी तंत्रज्ञान आणि सायबर सुरक्षेत दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढत आहे.

सीमापार दहशतवादाचा समान अनुभव असल्याने या संबंधांना अधिक बळ मिळाले आहे.

एकूणच, इस्रायलचा प्रश्न केवळ एका राष्ट्राच्या अस्तित्वापुरता मर्यादित नसून तो जागतिक शक्ती-संतुलन, सुरक्षा आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित आहे. पश्चिम आशियातील सध्याच्या घडामोडींमुळे या देशाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे.